# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट, दिनांक :-०५/०५/२०२३

---

### ऑनलाईन फसवणुकीतील १ लाख ७५ हजार रुपये होल्ड..
### सायबर पोलीस ठाणे, यवतमाळ यांची कामगिरी.

दिनांक-१९/०४/२०23 रोजी अवधुतवाडी, यवतमाळ येथे राहणा-या एका महिलेला मो.क्रं. ९८६४१३०१५७ यावरुन त्यांचे व्हॉटसअपवर you tube video ची एक लिंक आली व त्यासोबतच मेसेज आला की, हा व्हिडीओ व you tube channel Subscribe आणि Share करा तुम्हाला त्याकरिता पैसे देण्यात येतील. असा मेसेज आल्याने तक्रारदार महिला यांनी व्हिडीओ Subscribe आणि Share करुन २००० रुपये वरील नंबरवर पाठविले तेव्हा तक्रारदार यांना २८०० रुपये परत आले. खात्री पटल्याने तक्रारदार महिला यांनी ५०००, ३०,००० व ९०,०००० रुपये असे एकुण १,२५,००० रुपये वरील नंबरवर ऑनलाईन पेमेंट केले, नंतर त्यांना एकही रुपया परत न आल्याने त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी लागलीच सायबर ठाणे, यवतमाळ येथे धाव घेतली. सायबर पो.ठाणे येथील अधिकारी व अमंलदार यांनी तात्काळ तक्रारदार यांचेकडील माहिती घेवुन बँक स्टेटमेंटचा अभ्यास केला व National cyber crime Portal यावर तात्काळ तक्रार नोंदविल्याने तक्रारदार महिलेचे संपुर्ण १,२५,००० रुपये होल्ड करण्यात यश आले आहे.

याचप्रकारे दुस-या एका प्रकरणामध्ये दिनांक-२१/०४/२०२३ रोजी यवतमाळ येथे राहणारे विनीत पुनसे यांना व्हॉटसअपवर +२५१९२५९६३१९२ यावरुन पार्टटाईम जॉब करण्यासाठी मेसेज आला की, Ogilvy.ltd कंपनी कडुन बोलत असुन जॉब करण्यासाठी ईच्छुक आहात का? तेव्हा तक्रारदार यांनी तयारी दर्शविल्याने तक्रारदार यांना Telegram group मध्ये add करुन वेगवेगळे टास्क करायला सांगितले. तक्रारदार यांना दोनवेळा पैसे सुध्दा मिळाले, त्यानंतर तक्रारदार यांनी १५,०००/-, ५०,०००/-, ५०,०००/- रुपये त्यांना आलेल्या लिंकवर पाठविले. परंतु तक्रारदार यांना पुन्हा पैसे परत न मिळाल्याने त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी सायबर पो.ठाणे, यवतमाळ येथे धाव घेतली. सायबर येथील अधिकारी व अमंलदार यांनी तात्काळ दखल घेतल्याने तक्रारदार यांचे ५०,००० रुपये होल्ड करण्यात यश आले आहे. अशाप्रकारे वरील दोन ऑनलाईन फसवणुकीतील प्रकरणामध्ये एकुण १ लाख ७५ हजार रुपये होल्ड करण्यामध्ये सायबर पोलीस स्टेशन यांना यश आले आहे.

सदरची कार्यवाही डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि मनिष दिवटे, सपोनि विकास मुंढे, पोशि अजय निबोंळकर, अभिनव बोंद्रे, प्रणय ईटकर, सायबर पो.ठाणे यवतमाळ यांनी पार पाडली.

याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपल्याला लॉटरी, जॉब ऑफर, ईलेक्ट्रीक बिल, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन लोन किंवा ५ जी अपडेट ईत्यादीबाबत अनोळखी मोबाईल नंबरवरुन कॉल आल्यास अशा प्रकारच्या कोणत्याही अनोळखी कॉलला प्रतिसाद देवु नका किंवा कोणत्याही लिंकवर क्लीक करु नये. त्याचप्रमाणे Google वर Costumer care contact number सर्च करताना खात्री केल्याशिवाय सर्च केलेल्या मोबाईल क्रंमाकावर संपर्क करु नका. दुर्दैवाने आपल्यासोबत सायबर क्राईमचा प्रकार घडल्यास तात्काळ सायबर सेल येथे संपर्क करावा. तसेच १९३० या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या पोर्टलवर जावुन सायबर क्राईमबाबत ऑनलाईन तक्रार नोंदविता येईल.

**(मनिष दिवटे)**
पो.नि.सायबर पो.ठाणे,यवतमाळ